RNI No. MAHBIL/2012/44835
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# भाग एक–नाशिक विभागीय पुरवणी

वर्ष - १०, अंक - २२ ]   गुरुवार ते बुधवार, जून ३ - ९, २०२१ / ज्येष्ठ १३ - १९, शके १९४३   [ पृष्ठे ०८

## प्राधिकृत प्रकाशन

## संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

### जिल्हाधिकारी तथा समुचित प्रशासन यांजकडून

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ नुसार अधिसूचना**

**जिल्हा जळगाव**

क्रमांक भूसंपादन/मौजे मुंदखेडा बु./एसआर-६२/२०१६.– ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या जळगाव जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम *(१)* द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून अधिसूचना क्रमांक भूसंपादन/एसआर-६२/२०१६, दिनांक २८ जानेवारी २०२१ ते दिनांक ३ फेब्रुवारी २०२१ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची " एक " मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनींची, अनुसूची " दोन " मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, जिल्हाधिकारी, जळगाव यांनी कलम १५ च्या पोट-कलम *(२)* अन्वये दिलेला अहवाल (कोणताही असल्यास) विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनी संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्यांची खात्री पटली आहे; आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम *(१)* च्या तरतुदींन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनींची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची " तीन " मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी " पुनर्वसाहत क्षेत्र " म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची " चार " मध्ये विनिर्दिष्ट केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, चाळीसगाव भाग, चाळीसगाव, तालुका चाळीसगाव, जिल्हा जळगाव (अधिसूचना काढणेपूर्वी अधिकाऱ्याचे नाव व पत्ता नमूद करावा) यांना पदनिर्देशित करीत आहेत.

**अनुसूची - एक**

**संपादित करावयाच्या जमिनींचे वर्णन**

**जिल्हा जळगाव, तालुका चाळीसगाव, मौजे मुंदखेडे बु.**

| भूमापन किंवा गट क्रमांक | | संपादित क्षेत्र |
|---|---|---|
| १ | | २ |
| | | हे. आर |
| १२/१-अ | .. | ० १९ |
| १६/५ | .. | ० ०८ |
| ९४ | .. | ० ११ |
| ९५ | .. | ० ०२ |

**अनुसूची - दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव** : मौजे मुंदखेडे बु., तालुका चाळीसगाव येथील खाजगी जमीन उजवा कालवा कामाकरिता भूसंपादन करणेबाबत.

**प्रकल्प कार्याचे वर्णन** : मौजे मुंदखेडे बु., तालुका चाळीसगाव येथील खाजगी जमीन उजवा कालवा कामाकरिता भूसंपादन करणेबाबत.

**समाजाला मिळणारे लाभ** : सिंचन व पाणीपुरवठा.

**अनुसूची - तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन** : निरंक

**अनुसूची - चार**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश** : निरंक.

**टिपा :**

(१) प्रस्तावित संपादनाखालील उक्त शेतजमिनींच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी कार्यालय, चाळीसगाव भाग, चाळीसगाव तसेच उपविभागीय अधिकारी, लघु पाटबंधारे, उपविभाग, पाचोरा यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

(२) उक्त अधिसूचना प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून तर कार्यवाही पूर्ण होईपर्यंत प्रारंभिक उल्लेख केलेल्या जमिनींचा कोणत्याही व्यक्तीने व्यवहार करू नये किंवा सदर जमिनींवर बोजा व अडथळा करू नये.

(३) संबंधित तलाठी यांनी संबंधित ७/१२ उताऱ्यावर संपादनाबाबत नोंद घ्यावी.

(४) दुय्यम निबंधक, चाळीसगाव यांनी संपादनाखालील गटाच्या खरेदी-विक्रीवर निर्बंधाबाबत कायद्यानुसार कार्यवाही करावी.

**अभिजीत राऊत,**
जिल्हाधिकारी तथा
समुचित प्रशासन, जळगाव.

जळगाव, ९ एप्रिल २०२१.

---

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ नुसार अधिसूचना**

**जिल्हा जळगाव**

क्रमांक भूसंपादन/मौजे हिरापूर/एसआर-८३/२०२०.— ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या जळगाव जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम *(१)* द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून अधिसूचना क्रमांक भूसंपादन/एसआर-८३/२०२०, दिनांक १४ ऑक्टोबर २०२० ते दिनांक २९ ऑक्टोबर २०२० अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची " एक " मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनींची, अनुसूची " दोन " मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, जिल्हाधिकारी, जळगाव यांनी कलम १५ च्या पोट-कलम *(२)* अन्वये दिलेला अहवाल (कोणताही असल्यास) विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनी संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्यांची खात्री पटली आहे; आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम *(१)* च्या तरतुदींन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनींची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची " तीन " मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी " पुनर्वसाहत क्षेत्र " म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची " चार " मध्ये विनिर्दिष्ट केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, चाळीसगाव भाग, चाळीसगाव, तालुका चाळीसगाव, जिल्हा जळगाव (अधिसूचना काढणेपूर्वी अधिकाऱ्याचे नाव व पत्ता नमूद करावा) यांना पदनिर्देशित करीत आहेत.

### अनुसूची - एक

### संपादित करावयाच्या जमिनींचे वर्णन

### जिल्हा जळगाव, तालुका चाळीसगाव, मौजे हिरापूर

| भूमापन किंवा गट क्रमांक | | संपादित क्षेत्र |
|---|---|---|
| १ | | २ |
| | | हे. आर |
| १४३ प्लॉट नंबर - ३९ | .. | ० ०५.५० |
| १४३ प्लॉट नंबर - १४८ | .. | ० ०६ |
| १४३ प्लॉट नंबर - १५० | .. | ० ०३ |
| **एकूण ..** | | **० १४.५०** |

### अनुसूची - दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव** : मौजे हिरापूर येथील खाजगी जमीन तिसऱ्या रेल्वे महामार्गकरिता भूसंपादन करणेबाबत.

**प्रकल्प कार्याचे वर्णन** : मौजे हिरापूर येथील खाजगी जमीन तिसऱ्या रेल्वे महामार्गकरिता भूसंपादन करणेबाबत.

**समाजाला मिळणारे लाभ** : रेल्वे महामार्ग

### अनुसूची - तीन

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन** : निरंक

### अनुसूची - चार

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश** : निरंक.

**टिपा :**

(१) प्रस्तावित संपादनाखालील उक्त शेतजमिनींच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी कार्यालय, चाळीसगाव भाग, चाळीसगाव तसेच उपमुख्य अभियंता (निर्माण) मध्ये रेल्वे भुसावळ यांचे कार्यालयात निरीक्षण करता येईल.

(२) उक्त अधिसूचना प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून तर कार्यवाही पूर्ण होईपर्यंत प्रारंभिक उल्लेख केलेल्या जमिनींचा कोणत्याही व्यक्तीने व्यवहार करू नये किंवा सदर जमिनींवर बोजा व अडथळा करू नये.

(३) संबंधित तलाठी यांनी संबंधित ७/१२ उताऱ्यावर संपादनाबाबत नोंद घ्यावी.

(४) दुय्यम निबंधक, चाळीसगाव यांनी संपादनाखालील गटाच्या खरेदी-विक्रीवर निर्बंधाबाबत कायद्यानुसार कार्यवाही करावी.

**अभिजीत राऊत,**
जिल्हाधिकारी तथा
समुचित प्रशासन, जळगाव.

जळगाव, २४ जानेवारी २०२१.

---

## अपर जिल्हादंडाधिकारी यांजकडून

**वाचले :** (१) पोलीस अधीक्षक, धुळे यांचेकडील पत्र क्रमांक जिविशा/प्रतिबंधात्मक आदेश-८७४/२०२१, दिनांक १८ एप्रिल २०२१.

(२) मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ *(१)* व *(३)*.

### आदेश

क्रमांक ड/कक्ष-३/एमएजी-२/कावि-९९९/२०२१.– उपोद्घातातील नमूद अनुक्रमांक (१) अन्वये पोलीस अधीक्षक, धुळे यांनी विनंती केली आहे की, धुळे जिल्ह्यातील आगामी काळात मराठा क्रांती मोर्चा, धनगर आरक्षण मोर्चा, मुस्लीम आरक्षण, ओ. बी. सी. संघटना अशा व इतर संघटना विविध प्रकारची आंदोलने करीत आहेत. तसेच दिनांक २७ एप्रिल २०२१ रोजी हनुमान जयंती व दिनांक १ मे २०२१ रोजी १ मे महाराष्ट्र दिन असून सध्या कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर वाढत असून तसेच वरीलप्रमाणे आंदोलन, मोर्चे, विविध कार्यक्रम होणार असल्याने प्रतिबंधात्मक उपाययोजनांची अंमलबजावणी योग्यप्रकारे करण्यासाठी धुळे जिल्ह्यात प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास्तव, दिनांक २७ एप्रिल २०२१ रोजीचे ००.०१ वाजलेपासून दिनांक ११ मे २०२१ रोजीचे २३.५५ वाजेपावेतो मुंबई पोलीस कायदा, कलम ३७ *(१)* व *(३)* चे प्रतिबंधात्मक आदेश जारी होऊन प्रसिद्धी होणेस विनंती केलेली आहे.

धुळे जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकामी पोलिसांना मदत व्हावी म्हणून पोलीस अधीक्षक, धुळे यांनी सादर केलेला अहवाल व वरील परिस्थिती पाहता माझी खात्री झालेने संपूर्ण धुळे जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहणेसाठी व परिस्थितीवर नियंत्रण ठेवणेसाठी पोलिसांना मदत व्हावी म्हणून मी, संजय गायकवाड, अपर जिल्हादंडाधिकारी, धुळे मला उपोद्घातात नमूद अनुक्रमांक (२) अन्वये मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ *(१)* व *(३)* नुसार प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून धुळे जिल्ह्यातील कोणत्याही इसमास खालील कृत्ये करण्यास याद्वारे मनाई करीत आहे.

(अ) सोटे, तलवारी, बंदुका, भाले, सुरे, लाठ्या किंवा शारीरिक दुखापती करण्यासाठी वापरात येतील अशी कोणतीही हत्यारे अथवा वस्तू बरोबर घेऊन फिरणे ;

(ब) अंग भाजून टाकणारा कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ किंवा द्रव्ये बरोबर घेऊन फिरणे ;

(क) दगड अगर अस्त्रे, सोडावयाची अगर फेकण्याची हत्यारे, साधने इत्यादी तयार करणे, जमा करणे आणि बरोबर नेणे ;

(ड) सार्वजनिक शांतता धोक्यात येईल अशी भाषणे करणे, हावभाव करणे अथवा सोंग आणणे ;

(इ) जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणणे, वाद्ये वाजविणे ;

(फ) कोणत्याही व्यक्तीची आकृती किंवा प्रतिमेचे प्रदर्शन करणे ;

(ग) सभा घेण्यास, मिरवणुका काढण्यास, पाच किंवा पाचापेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यास मनाई करीत आहे ;

(ह) संबंधित तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांनी दिलेल्या परवानगीशिवाय काढण्यात आलेले मोर्चे, रॅली, सभा ;

मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ *(१)* व *(३)* हा आदेश ज्यांना लाठी अगर तत्सम वस्तू घेतल्याशिवाय चालता येत नाही, अशा अपंग इसमांना लागू नाही. तसेच शासनाच्या सेवेतील ज्या व्यक्तींना आपल्या वरिष्ठांचे आदेशानुसार कर्तव्यपूर्तीसाठी हत्यार बाळगणे आवश्यक आहे, त्यांना लागू होणार नाहीत.

तसेच, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ *(१)* व *(३)* नुसार संबंधित तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे पूर्वपरवानगीशिवाय पाचपेक्षा जास्त व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही मंडळीस (जमावास) किंवा मिरवणुकीस मनाई करीत आहे व सदर कालावधीत सभा, मिरवणुका, मोर्चे, मीटिंग, कार्यक्रम व रॅली इत्यादी परवानगीबाबत स्थानिक पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांच्या सहमतीने संबंधित तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांनी कायदा व सुव्यवस्था राखणेबाबत योग्य तो निर्णय घेऊन परवानगी द्यावी. अशी देण्यात आलेली परवानगी, तसेच लग्न मिरवणुका, धार्मिक मिरवणुका, आठवडे बाजार अगर प्रेतयात्रेच्या जमावास शासनाने वेळोवेळी दिलेले सदर निर्बंध लागू असतील.

सदरचा आदेश हा दिनांक २७ एप्रिल २०२१ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दिनांक ११ मे २०२१ रोजीचे २३.५५ वाजेपावेतो संपूर्ण धुळे जिल्ह्यात अंमलात राहील.

सदरचा आदेश हा दिनांक २३ एप्रिल २०२१ रोजी माझे सही व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

**संजय गायकवाड,**
अपर जिल्हादंडाधिकारी, धुळे.

धुळे, २३ एप्रिल २०२१.

---

## उपनिबंधक, सहकारी संस्था यांजकडून

### आदेश

क्रमांक वि-१/एनएसके/एनएसके/एचएसजी/टीसी/६०३२/१५३२/सन २०२०.– **ईश्वर रेसिडेन्सी को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड,** नाशिक ही संस्था सर्व्हे नंबर ४८४/१-अ+ब/२ ते १२/२, प्लॉट नंबर २+३+४ यांसी एकूण क्षेत्र ९११.७५ चौ. मी. नाशिक शिवार, पाटीदार भवन, जनरल वैद्यनगर, पौर्णिमा बसस्टॉप, नाशिक या मिळकतीवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ९ *(१)* अन्वये नोंदविण्यात आली असून महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ चे नियम १० अन्वये संस्थेचे वर्गीकरण **गृहनिर्माण संस्था** असून उपवर्गीकरण **भाडेकरू सहभागीदारी संस्था** असे करण्यात आल्याचे जाहीर करीत आहे.

**फयाज मुलाणी,**
उपनिबंधक,
सहकारी संस्था, नाशिक तालुका,
जिल्हा नाशिक.

नाशिक, १३ जुलै २०२०.

---

## सहायक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) यांजकडून

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०२ व १०३ अन्वये.**

**वाचावे.-** (१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०२ व १०३ मधील तरतूद.

(२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०२ व १०३ अन्वये संस्था अवसायनात घेणेबाबतचे या कार्यालयाचे जा. क्र. जिदुविअ/जळगाव/सहकार/अंतिम आदेश/७३९/२०१५, दिनांक २१ एप्रिल २०१५.

(३) श्री. गोकुळ लहू पाटील, विस्तार पर्यवेक्षक ज. जि. दुध उत्पा. सह. संघ लिमिटेड, जळगाव हे नियत वयोमानाने सेवानिवृत्त झाल्याने.

### आदेश

क्रमांक जिदुविअ/जळगाव/अव. आदेश बदल/शेंदुर्णी दूध सो/५३९/१६२/सन २०२०.-मी, रविंद्र पाटील, सहायक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), जळगाव मला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०३ (४) नुसार प्राप्त झालेल्या अधिकारानुसार आदेश देतो की, या कार्यालयाचे वाचावे क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०२ अन्वये निर्गमित या कार्यालयाचे जावक क्रमांक जिदुविअ/जळगाव/सहकार/अंतिम

आदेश/७३९/२०१५, दिनांक २१ एप्रिल २०१५ च्या अंतिम आदेशात अंशत: फेरबदल करून **शेंदुर्णी दूध उत्पादक सहकारी संस्था मर्यादित,** शेंदुर्णी, तालुका जामनेर, जिल्हा जळगाव या संस्थेचे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०५ अन्वये कामकाज करण्यासाठी श्री. व्ही. एस. पाटील, सहायक अधिकारी, जळगाव यांची नवीन अवसायक म्हणून नियुक्ती करणेत येत आहे.

**रविंद्र र. पाटील,**
सहायक निबंधक,
सहकारी संस्था (दुग्ध), जळगाव.

जळगाव, २१ जुलै २०२०.

---

## सहायक निबंधक, सहकारी संस्था यांजकडून

### महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०२ अन्वये

### अंतिम आदेश

क्रमांक सैनिक/वि-१/पद्मावती म.ग्रा.बि.पत/क.१०२/अंतिम आदेश/५८२/सन २०२०.–महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०२ *(१) (क) (दोन)* मधील तरतुदीअन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, डॉ. अंजली आ. वाघमारे, सहायक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर आदेश देते की, **पद्मावती महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित,** कर्जत, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर ही संस्था अवसायनात घेण्यात येऊन दिलेला मध्यंतरीय आदेश कायम करून संस्था अवसायनात घेणेबाबत अंतिम आदेश देत असून श्री. एस. डी. पाटील, सहकार अधिकारी (श्रेणी-१), अधीन सहायक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत यांची अवसायक म्हणून नेमणूक करीत आहे.

सदरचा आदेश आज दिनांक ४ ऑगस्ट २०२० रोजी माझ्या सहीशिक्क्यानिशी दिला असे.

**डॉ. अंजली आ. वाघमारे,**
सहायक निबंधक,
सहकारी संस्था, कर्जत,
जिल्हा अहमदनगर.

कर्जत, ४ ऑगस्ट २०२०.

---

### महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०२ अन्वये

### अंतिम आदेश

क्रमांक सनिक/वि-१/नागेश्वर अभि. बहु. उ. संस्था/क.१०२/अंतिम आदेश/५९०/सन २०२०.–महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०२ *(१) (क) (दोन)* मधील तरतुदीअन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, डॉ. अंजली आ. वाघमारे, सहायक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर आदेश देते की, **नागेश्वर अभिनव बहुउद्देशीय सहकारी संस्था मर्यादित,** थेरगाव, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर ही संस्था अवसायनात घेण्यात येऊन दिलेला मध्यंतरीय आदेश कायम करून संस्था अवसायनात घेणेबाबत अंतिम आदेश देत असून श्री. एस. डी. पाटील, सहकार अधिकारी (श्रेणी-१), अधीन सहायक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत यांची अवसायक म्हणून नेमणूक करीत आहे.

सदरचा आदेश आज दिनांक ४ ऑगस्ट २०२० रोजी माझ्या सहीशिक्क्यानिशी दिला असे.

**अंजली आ. वाघमारे,**
सहायक निबंधक,
सहकारी संस्था, कर्जत,
जिल्हा अहमदनगर.

कर्जत, ४ ऑगस्ट २०२०.

---

### आदेश

क्रमांक वि. हौ./कलम-२१/नों.रद्द/१६८/२०२०.–मी, नामदेव सुर्यवंशी, सहायक निबंधक, सहकारी संस्था, बोदवड, तालुका बोदवड, जिल्हा जळगाव मला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम २१ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार **बोदवड हौसिंग सहकारी संस्था मर्यादित,** बोदवड, तालुका बोदवड ही संस्था नोंदणी क्रमांक १७७२ व दिनांक ३ जुलै १९५७ नुसार नोंदणी केलेली असून संस्थेच्या सभासदांचा हेतू पूर्ण झाल्याने, सदर संस्थेची नोंदणी रद्द करणेबाबत स्वखुशीने ठराव मंजूर केलेला असून, पदाधिकाऱ्यांना सदर संस्था यापुढे चालविण्याची नसल्याने, सदर संस्थेचे कामकाज करण्याचे बंद झालेले असल्याने, संस्थेचा कारभार गुंडाळलेला असल्याने, सदर संस्थेची नोंदणी रद्द करीत आहे. या आदेशाचे तारखेपासून सदरची संस्था विघटित झाली आहे असे समजण्यात यावे. तसेच ती संस्था या आदेशाचे तारखेपासून निगमनिकाय म्हणून अस्तित्वात असल्याचे बंद झाले आहे.

तसेच सोबत जोडलेल्या परिशिष्टाप्रमाणे त्या-त्या सभासदांना त्यांच्या नावावर दर्शविल्याप्रमाणे नियमाप्रमाणे शासनाची फी भरून, सिटी सर्व्हे रेकॉर्डला त्यांचे नाव लावण्यात यावे.

सदरचा आदेश आज दिनांक ११ सप्टेंबर २०२० रोजी माझे सहीशिक्क्यानिशी दिला असे.

**नामदेव सुर्यवंशी,**
सहायक निबंधक,
सहकारी संस्था, बोदवड.

बोदवड, ११ सप्टेंबर २०२०.

---

## प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांजकडून

**वाचा.-** (१) शासन निर्णय क्रमांक एचसीटी/२००९/प्र.क्र. १४१/का-तीन, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक २२ ऑक्टोबर २०१०.

(२) श्री. व्ही. ए. साठे, ५ वे सहदिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नाशिक यांचा जावक क्रमांक २१७७/२०२०, दिनांक २२ जुलै २०२० रोजीचा अर्ज.

**आदेश**

क्रमांक आस्था/रजा/३३२२/२०२०.— प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नाशिक हे खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहेत.

श्री. व्ही. ए. साठे, ५ वे सहदिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नाशिक यांना संदर्भीय शासन निर्णयांमध्ये नमूद केल्यानुसार ३० दिवसांची अर्जित रजा फक्त रजा रोखीकरणाकरिता १ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२२ या गटवर्षाकरिता प्रत्यक्षात अर्जित रजेच्या सुविधेचा लाभ न देता मंजूर करण्यात येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री. व्ही. ए. साठे, ५ वे सहदिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नाशिक यांचे सेवापुस्तकात घेण्यात यावी.

नाशिक, २३ जुलै २०२०.

---

**वाचा.-** (१) शासन निर्णय क्रमांक एचसीटी/२००९/प्र.क्र. १४१/का-तीन, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक २२ ऑक्टोबर २०१०.

(२) श्री. एस. पी. नाईक-निंबाळकर, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, नाशिक यांचा जावक क्रमांक २४८/२०२०, दिनांक ३१ ऑगस्ट २०२० रोजीचा अर्ज.

**आदेश**

क्रमांक आस्था/रजा/३७७७/२०२०.— प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नाशिक हे खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहेत.

श्री. एस. पी. नाईक-निंबाळकर, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, नाशिक यांना संदर्भीय शासन निर्णयांमध्ये नमूद केल्यानुसार ३० दिवसांची अर्जित रजा फक्त रजा रोखीकरणाकरिता १ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२२ या गटवर्षाकरिता प्रत्यक्षात अर्जित रजेच्या सुविधेचा लाभ न देता मंजूर करण्यात येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री. एस. पी. नाईक-निंबाळकर, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, नाशिक यांचे सेवापुस्तकात घेण्यात यावी.

नाशिक, ५ सप्टेंबर २०२०.

---

**वाचा.-** (१) जिल्हा न्यायालय, नाशिक इंग्रजी आदेश क्रमांक आस्था/३६४८/२०, दिनांक २८ ऑगस्ट २०२०.

(२) श्री. एम. ए. शिंदे, जिल्हा न्यायाधीश-१० व सहायक सत्र न्यायाधीश, नाशिक यांचा जावक क्रमांक ३२/२०२०, दिनांक ५ सप्टेंबर २०२० रोजीचा अर्जित रजा रद्द होऊन मिळणेबाबतचा विनंती अर्ज.

**आदेश**

क्रमांक आस्था/रजा/३७९१/२०२०.— प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नाशिक हे खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहेत.

श्री. एम. ए. शिंदे, जिल्हा न्यायाधीश-१० व सहायक सत्र न्यायाधीश, नाशिक यांना संदर्भिय आदेश क्रमांक १ अन्वये दिनांक २५ ऑगस्ट २०२० ते ११ सप्टेंबर २०२० पावेतो अशी एकुण १८ दिवसांची अर्जित रजा मुख्यालय सोडणेचे परवानगीसह मंजूर करण्यात आलेली आहे.

तथापि श्री. एम. ए. शिंदे, जिल्हा न्यायाधीश-१० व सहायक सत्र न्यायाधीश, नाशिक यांचे उपरोक्त संदर्भीय अर्ज क्रमांक २ चे विनंती अर्जाप्रमाणे सदर मंजूर रजेपैकी दिनांक ५ सप्टेंबर २०२० ते ११ सप्टेंबर २०२० पावेतोची एकूण ७ दिवसांची अर्जित रजा रद्द करण्यात येत आहे.

सदरचे आदेशाची नोंद श्री. एम. ए. शिंदे, जिल्हा न्यायाधीश-१० व सहायक सत्र न्यायाधीश, नाशिक यांचे सेवापुस्तकात घेण्यात यावी.

नाशिक, ७ सप्टेंबर २०२०.

---

**वाचा.-** (१) शासन निर्णय क्रमांक एचसीटी/२००९/प्र.क्र. १४१/का-तीन, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक २२ ऑक्टोबर २०१०.

(२) श्री. नितिन निवृत्ती चिंतामणी, दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, येवला यांचा जावक क्रमांक २४९/२०२०, दिनांक ४ सप्टेंबर २०२० रोजीचा अर्ज.

**आदेश**

क्रमांक आस्था/रजा/३८८२/२०२०.— प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नाशिक हे खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहेत.

श्री. नितिन निवृत्ती चिंतामणी, दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, येवला यांना संदर्भीय शासन निर्णयांमध्ये नमूद केल्यानुसार ३० दिवसांची अर्जित रजा फक्त रजा रोखीकरणाकरिता १ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२२ या गटवर्षाकरिता प्रत्यक्षात अर्जित रजेच्या सुविधेचा लाभ न देता मंजूर करण्यात येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री. नितिन निवृत्ती चिंतामणी, दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, येवला यांचे सेवापुस्तकात घेण्यात यावी.

**अभय सो. वाघवसे,**

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,

नाशिक.

नाशिक, १४ सप्टेंबर २०२०.

---

**आदेश**

क्रमांक कार्यव्य/रजा/७/सन २०२०.- श्री. एच. एस. सातभाई, जिल्हा न्यायाधीश-२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, नेवासा यांना दिनांक २७ जुलै २०२० ते दिनांक ३१ जुलै २०२० रोजीची एकूण पाच दिवसांची वैद्यकीय रजा याद्वारे कार्योत्तर मंजूर करण्यात येत आहे.

रजेवरून परत आल्यावर श्री. एच. एस. सातभाई यांना जिल्हा न्यायाधीश-२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, नेवासा या पदी पुनर्नियुक्त करणेत येत आहे. तसेच वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत जिल्हा न्यायाधीश-२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, नेवासा या पदी पर्यायी इसमाच्या नेमणुकीची आवश्यकता नसल्याने सदरचे पद रिक्त ठेवण्यात येत आहे.

श्री. एच. एस. सातभाई, जिल्हा न्यायाधीश-२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, नेवासा यांचे वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत त्यांचे पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री. एस. एम. तापकिरे, जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, नेवासा यांचेकडे ठेवण्यात आला होता.

श्री. एच. एस. सातभाई, जिल्हा न्यायाधीश-२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, नेवासा हे वर नमूद केलेल्या कालावधीत वैद्यकीय रजेवर गेले नसते, तर ते जिल्हा न्यायाधीश-२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, नेवासा या पदी स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

अहमदनगर, ४ ऑगस्ट २०२०.

---

**आदेश**

क्रमांक कार्यव्य/रजा/९८/सन २०२०.- श्री. पी. पी. मोदी, दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, राहाता यांना दिनांक २७ जुलै २०२० ते दिनांक २९ जुलै २०२० रोजीची मंजूर करण्यात आलेली किरकोळ रजा याद्वारे रद्द करणेत येत आहे. त्याऐवजी त्यांची दिनांक २७ जुलै २०२० ते दिनांक ३१ जुलै २०२० रोजीची एकूण पाच दिवसांची वैद्यकीय रजा याद्वारे कार्योत्तर मंजूर करण्यात येत आहे.

रजेवरून परत आल्यावर श्री. पी. पी. मोदी यांना दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, राहाता या पदी पुनर्नियुक्त करणेत येत आहे. तसेच वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, राहाता या पदी पर्यायी इसमाच्या नेमणुकीची आवश्यकता नसल्याने सदरचे पद रिक्त ठेवण्यात आले होते.

श्री. पी. पी. मोदी, दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, राहाता यांचे वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत त्यांचे पदाचा अतिरिक्त कार्यभार श्रीमती एस. एन. सचदेव दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, राहाता यांचेकडे ठेवण्यात आलेला होता.

श्री. पी. पी. मोदी, दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, राहाता हे वर नमूद केलेल्या कालावधीत वैद्यकीय रजेवर गेले नसते, तर ते दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, राहाता या पदी स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

अहमदनगर, ४ ऑगस्ट २०२०.

---

**आदेश**

क्रमांक कार्यव्य/रजा/७/सन २०२०.- श्री. एच. एस. सातभाई, जिल्हा न्यायाधीश-२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, नेवासा यांना दिनांक ५ ऑगस्ट २०२० ते दिनांक ७ ऑगस्ट २०२० रोजीपर्यंतची एकूण तीन दिवसांची अर्जित रजा याद्वारे मंजूर करण्यात येत आहे.

रजेवरून परत आल्यावर श्री. एच. एस. सातभाई यांना जिल्हा न्यायाधीश-२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, नेवासा या पदी पुनर्नियुक्त करणेत येत आहे. तसेच वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत जिल्हा न्यायाधीश-२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, नेवासा या पदी पर्यायी इसमाच्या नेमणुकीची आवश्यकता नसल्याने सदरचे पद रिक्त ठेवण्यात येत आहे.

श्री. एच. एस. सातभाई, जिल्हा न्यायाधीश-२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, नेवासा यांचे वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत त्यांचे पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री. एस. एम. तापकिरे, जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, नेवासा यांचेकडे ठेवण्यात येत आहे.

श्री. एच. एस. सातभाई, जिल्हा न्यायाधीश-२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, नेवासा यांचे न्यायालयातील वरील कालावधीत

प्रकरणांचा कार्यभार श्री. एस. एम. तापकिरे, जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, नेवासा यांनी प्रथम सत्रातच पहावा. श्री. एच. एस. सातभाई, जिल्हा न्यायाधीश-२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, नेवासा यांचे न्यायालयातील संबंधित कर्मचारी यांनी प्रथम सत्रातच काम पहावे व संबंधित वकील व पक्षकार यांना याबाबत सूचित करावे.

श्री. एच. एस. सातभाई, जिल्हा न्यायाधीश-२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, नेवासा हे वर नमूद केलेल्या कालावधीत अर्जित रजेवर गेले नसते, तर ते जिल्हा न्यायाधीश-२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, नेवासा या पदी स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

अहमदनगर, ५ ऑगस्ट २०२०.

---

## आदेश

क्रमांक कार्यव्य/रजा/८३/सन २०२०.- श्रीमती ए. बी. निवारे, सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, नेवासा यांना दिनांक १० ऑगस्ट २०२० ते दिनांक १४ ऑगस्ट २०२० रोजीपर्यंतची एकूण पाच दिवसांची अर्जित रजा याद्वारे मंजूर करण्यात येत आहे.

रजेवरून परत आल्यावर श्रीमती ए. बी. निवारे यांना सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, नेवासा या पदी पुनर्नियुक्त करणेत येत आहे. तसेच वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, नेवासा या पदी पर्यायी इसमाच्या नेमणुकीची आवश्यकता नसल्याने सदरचे पद रिक्त ठेवण्यात येत आहे.

श्रीमती ए. बी. निवारे, सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, नेवासा यांचे वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत त्यांचे पदाचा अतिरिक्त कार्यभार श्रीमती पी. व्ही. राऊत, २ रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, नेवासा यांचेकडे ठेवण्यात येत आहे.

श्रीमती ए. बी. निवारे, सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, नेवासा यांचे वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत त्यांचे पदाचा अतिरिक्त कार्यभार श्रीमती पी. व्ही. राऊत, २ रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, नेवासा यांनी दुपार सत्रातच पाहावा. श्रीमती ए. बी. निवारे, सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, नेवासा यांचे न्यायालयातील संबंधित कर्मचारी यांनी दुपार सत्रातच काम पहावे व संबंधित वकील व पक्षकार यांना याबाबत सूचित करावे.

श्रीमती ए. बी. निवारे, सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, नेवासा ह्या वर नमूद केलेल्या कालावधीत अर्जित रजेवर गेल्या नसत्या, तर त्या सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, नेवासा या पदी स्थानापन्न म्हणून काम करीत राहिल्या असत्या.

**श्रीकांत ल. आणेकर,**
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
अहमदनगर.

अहमदनगर, १० ऑगस्ट २०२०.

---

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.